स्टेशन रोड, सदर, नागपूर ४४०००१
फोन नं. २५३३२०२, पी.बी.एक्स.नं. २५३१४३१, २५३१४३२, फॅक्स नं. ०७१२ २५३१४३१

क्र./इ.अ.(द.)/ 34 नागपूर, दिनांक 08/09/21

दुरूस्तीपत्र

प्रति,

श्रीमती. लतिका ओमप्रकाश बनोदे,
श्री. अतुलकुमार अरुनकुमार बनोदे,
श्री. रमेशकुमार राधकृष्णा बनोदे,
श्री. ओमप्रकाश राधकृष्णा बनोदे,
रा. जुनी शुक्रवारी, योगेश बिछायत जवळ,
नागपूर.

विषय :– मौजा– **चिखली (खुर्द)**, खसरा क्रमांक **१८/२** मधील भुखंड कमांक **१** हा **गुरु कृपा गृह निर्माण सहकारी संस्था (ब्लॉक डी)** या अभिन्यासातील असून सदर भुखंडासाठी जारी करण्यात आलेल्या नियमीतीकरण पत्रात दुरूस्ती करण्याबाबत

संदर्भ :– १) नियमितीकरण पत्र कमांक **BE(S)/ 1900/728/03/458**, दि. **16/04/2004.**
२) आपला दिनांक २५/०६/२०२१ चा अर्ज.

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपणास दिनांक **01/10/2011** ला निर्गमित करण्यात आलेल्या नियमितीकरण पत्रातील भुखंडकाचे लांबी मध्ये आपण सादर केलेल्या L.S. स्केचच्या आधारे खालीप्रमाणे दूरूस्ती करण्यात येत आहे. या पुढे ही नोंद नागपूर सुधार प्रन्यासच्या संबंधीत सर्व कामकाजासाठी ग्राहय धरता येईल. हे पत्र भुखंडाची मालकी सिध्द करण्यासाठी ग्राहय धरता येणार नाही आणि आपणास देण्यात आलेल्या नियमितीकरण पत्रासोबत जोडलेल्या सहपत्रातील इतर शर्ती व अटी जशाच्या तशा लागु राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

दुरूस्तीचा तपशील	
जुनी नोंद	**नवी नोंद**
Reference :- 1) Plot Boundary Shown Thus 2) Area Surrendered to N.I.T. for road widening Dimensions of Plot in Meter :- AB 42.15 MT. FG 31.880 MT. BC 56.75 MT. GH 1.750 MT. CD 32.93 MT. HI 19.75 MT. ED 14.33 MT. EF 4.00 MT. Scale : N.T.S. **PLOT AREA AS PER SALEDEED = 2589.980 Sq.M.** **TANGENT AREA @ 9.00 MT. = 17.36 Sq.M.** **REGULARIZED PLOT AREA = 2183.53 Sq.M.**  	Reference :- 1) The Boundav Shown Thus 2) Area Surrendered to NIT for road widening **Dimensions of Plot In Meter :-** AB 30.764 MT. BC 0.000 MT. CD 40.960 MT. DA 62.012 MT. Scale : NT.S. **PLOT AREA AS PER L.S. SKETCH = 2223.874 Sq.M.** **TANGENT AREA @ 9.00 MT. = 17.84Sq.M.** **REGULARIZED PLOT AREA = 2206.034 Sq.M.** 

अर्जदाराने दिनांक १.१.२००१ पुर्वी पाडण्यात आलेले व हस्तांतरीत करण्यात आलेले भुखंडाचा पुरावा व सादर केलेले हमीपत्र याचे आधारे

हे दुरूस्ती नियमितीकरण खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ च्या कलम ५(१) अन्वये हा भूखंड अकृषिक वापरामध्ये रूपांतर केले असल्याचे मानन्यात येतो म्हणून भूखंड धारकाने अकृषिक आकारणीची शुल्काचा भरणा तहसिलदार यांचे कडे करावा. मात्र या अधिनियमाचे कलम ३ (२) घ नुसार नियमाधीन करण्यामुळे, जमिनीच्या किंवा इमारतीच्या संदर्भात अशा प्रकारे नियमाधिन करण्यापुर्वी त्याच्या धारकांकडे नसलेला असा मालकी हक्क किंवा दावा प्रदान केला जात नसल्याने नगर भुमापन कार्यालयो आखिव पत्रिकेमधे नोंद घेण्यापुर्वी रेव्हन्यु रेकार्ड नूसार भूखंडधारकाची नियमितीकरणापुर्वी पासुन मालकी हक्काची तपासणी करून आखिव पत्रिकेत नोंद घ्यावी.

अकृषक कराचा भरणा करून शासनाचे सक्षम प्राधिकरणाकडून अशी नोंद ''आखिव पत्रिकेत'' आल्यानंतर त्याची साक्षांकीत प्रत जोडून नाहरकत प्रमाण पत्र / नावाची नोंद / इमारत नकाशे इत्यादी करिता अर्ज नागपूर सुधार प्रन्यास मधे स्विकारल्या जातील.

२) हे नियमितीकरण यु.एल.सी./ सक्षम प्राधिकरण / न्यायालय / नगर भूमापन / व इतर ठिकाणचे दावे असल्यास भविष्यात त्याच्या निकालाचे अधिन करण्यात येत आहे. त्यावर या नियमितीकरणाचा प्रभाव राहणार नाही. तसेच अर्जदाराने दिलेल्या माहितीमध्ये काही अनियमितता / चुकीचे विवेचन लक्षात आल्यास हे नियमितीकरण रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

३) अर्जदाराने नागपूर सुधार प्रन्यासचे नाहरकत प्रमाण पत्र घेतल्या शिवाय भूखंडाची विक्री/गहाण/हस्तांतरण विक्रीपत्र करू नये.

४) पूर्व परवानगी शिवाय भुखंडाचे विभाजन / एकत्रिकरण व इमारतीचे बांधकाम करू नये. रितसर इमारत परवाना (परिशिष्ट ड) घेवून बांधकामास सुरवात करावी व परिशिष्ट 'फ' / 'ग' /'ह' प्रमाणे सुचना देवून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर परिशिष्ट 'क' प्रमाणे इमारत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करावे.

५) नकाशात पिवळया रंगाने दाखविलेले बांधकाम काढण्याची प्रक्रीया तसेच रस्त्याकरिता लागणाऱ्या जागेचा ताबा अर्जदाराने ३० दिवसात नागपूर सुधार प्रन्यासला हस्तांतरीत करावयाचा आहे. मात्र तसे न केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता नागपूर सुधार प्रन्यास तर्फे कार्यवाही करण्यात येईल.

६) विकास नकाश्यातील आरक्षणे / रस्ते इत्यादीकरिता नागपूर सुधार प्रन्यासने घेतलेल्या जमिनीकरीता हस्तांतरणीय विकास हक्क/नुकसान भरपाई/पर्यायी भूखंड देण्याची जबाबदारी प्रन्यासची नाही. (कलम ३ (२) ग)

७) अभिन्यासामधील उपार्जित होण्याच्या प्रशमन शुल्काच्या रकमेच्या मर्यादेत विज पुरवठया व्यतिरिक्त पायाभूत सुविधा पुरविण्यात येतील. असे शुल्क विकास नकाश्यातील महत्वाचे रस्ते, मलवाहीका, पाण्याची लाईन इत्यादी करता नागपूर सुधार प्रन्यास खर्च करेल. (कलम ६ (१)) मात्र भूखंडाचे क्षेत्रफळ /उपलब्धता / पोचमार्ग इत्यादी करिता नागपूर सुधार प्रन्यास जबाबदार राहणार नाही.

Note:-

Blahare

Building Engineer (South)
Nagpur Improvement Trust

Copy to:

1. The Divisional officer South, Nagpur Improvement Trust for information with a copy of regularized plans for record.